# महाराष्ट्र विधानपरिषद

## सन २०२२ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन

**डॉ. परिणय फुके** , वि.प.स यांनी महाराष्ट्र विधानपरिषद नियम 101 अनुसार दिलेली **लक्षवेधी सूचना क्र.१३१** पुढीलप्रमाणे आहे.

"भंडारा व गोंदिया जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आस्थापनेवर असलेले अनेक कर्मचारी गेल्या कित्येक वर्षांपासून जिल्हाधिकारी कार्यालयातच कार्यरत असल्याचे निदर्शनास येणे, तालुका मुख्यालयी रिक्त पदे असताना देखील तिथे जाण्यास कुणीही इच्छुक नसणे, तहसील कार्यालय स्तरावर अनेक टेबलचा भार एकच कर्मचारी सांभाळत असणे, पदे रिक्त असल्याने सेवा संलग्नतेच्या नावावर इकडून तिकडे नाचविण्याचा प्रकार सुरू असणे, संघटना देखील या विषयावर बोलण्यास तयार नसणे, या पिळवणुकीने तहसील कार्यालय स्तरावर असलेले कर्मचारी त्रासले असून त्यांचे मानसिक धैर्य ढासळू लागले असणे, एका कर्मचा-याचा मृत्यू देखील याच कारणामुळे झाला असणे, तोच प्रकार आता आमगाव येथे सुरू असून एका दिव्यांग कर्मचा-याला सेवासंलग्नतेने दुस-या ठिकाणी पाठविण्याच्या हालचाली सुरू असणे, अधिकारी आणि कर्मचा-यांनी एका ठिकाणी किती वर्षे काम करावे याचे नियम ठरवून देण्यात आले असणे, त्याकरीता दरवर्षी मे महिन्यात विनंती आणि प्रशासकीय बदली करण्यात येणे, मात्र बदली केवळ कागदावर दाखवून जिल्हा मुख्यालयातच संपूर्ण नोकरी पूर्ण करण्याची प्रथा गोंदिया जिल्हाधिकारी कार्यालयात सुरू असणे, तालुका मुख्यालयावरील तहसील कार्यालय आणि जिल्ह्यातील चार उपविभागीय अधिकारी कार्यालयांतील अनेक पदे रिक्त असणे, त्या ठिकाणी बदली झाल्यानंतर सेवासंलग्नतेचे कारण देत कर्मचारी वरिष्ठ अधिका-यांशी संगनमत करून जिल्हाधिकारी कार्यालयातच राहणे पसंत करत असणे, याचा परिणाम तहसील कार्यालयांतील पदे रिक्त असल्यामुळे नागरिकांच्या दैनंदिन कामकाजावर होत असणे, यावर शासनाने तातडीने योग्य ती कार्यवाही करून संबंधीत रिक्त पदे भरण्याबाबत करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

लक्षवेधी सूचना
अति तात्काळ
काल मर्यादित

क्रमांक १७९५६ /म.वि.स./ई-2,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन मुंबई / नागपूर
दिनांक २३ ऑगस्ट, २०२२

**सचिव, महाराष्ट्र शासन, महसूल विभाग, यांच्याकडे आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित.**

निदेशानुसार आपणास कळविण्यात येते की, महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सद्य सत्रासाठी मा.उप सभापतींनी उपरोक्त लक्षवेधी सूचना वरील स्वरूपात स्वीकृत केली असून, या सूचनेवरील मा.मंत्री महोदयांच्या निवेदनाच्या 250 प्रती तात्काळ या सचिवालयाकडे पाठविण्यात याव्यात.

**या सूचनेवरील निवेदन सभागृहात केव्हा करावे लागेल ती तारीख आपणास मागाहून कळविण्यात येईल.**
**कृपया ही बाब अति-तातडीची समजण्यात यावी.**

आपला

कक्ष अधिकारी,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

(1) मा. महसूल मंत्री
(2) डॉ. परिणय फुके वि.प.स. यांना माहितीसाठी सादर अग्रेषित

टिप - **विद्यमान अधिवेशनाच्या सत्र व सत्र कालावधीचा उल्लेख लक्षवेधी सूचनेच्या मध्यभागी व लक्षवेधी सूचना क्रमांक निवेदनाच्या उजव्या बाजूला मांडण्या व ठळक अक्षरात लक्षवेधी सूचनेच्या निवेदन प्रतीवर छापण्यात यावा.**